सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : १९८ | शुक्रवार, दि. १० एप्रिल २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

उन्हाचा कडाका

## रस्ते ओस, बाजारपेठेतही शुकशुकाट

### पारा ४१ अंश सेल्सिअस; जनजीवन विस्कळीत

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : खान्देशात उन्हाचा तडाखा दिवसागणिक वाढत असून, अमळनेर शहरात गुरुवारी उष्णतेच्या लाटेने जनजीवन विस्कळीत झाले असून सोमवारी ४२ अंश सेल्सियस आणि आज ४१ अंश सेल्सियस तापमान नोंदविले गेले आहे. सकाळपासूनच सुरू झालेल्या उन्हाच्या तीव्रतेमुळे दुपारी १२ नंतर शहरातील प्रमुख रस्ते, चौक आणि गजबजलेल्या बाजारपेठांमध्ये शुकशुकाट पाहायला मिळाला. वाढत्या तापमानामुळे नागरिकांनी घराबाहेर पडणे टाळल्याने शहरात जणू 'दुपारची संचारबंदी' असल्यासारखे चित्र निर्माण झाले होते. नेहमी गजबजलेला स्टेशन रोड, मुख्य बाजारपेठ आणि बसस्थानक परिसरात दुपारी शुकशुकाट होता. उष्ण वाऱ्यांच्या झळांमुळे नागरिकांनी अत्यावश्यक कामाशिवाय बाहेर पडणे टाळले. याचा मोठा फटका हातावर पोट असणाऱ्या छोट्या व्यावसायिकांना, फेरीवाल्यांना आणि हातगाडीधारकांना बसला आहे. उष्णतेपासून बचाव करण्यासाठी नागरिक विविध उपाययोजना करत आहेत. घराबाहेर पडताना डोक्याला रुमाल बांधणे, टोपी किंवा छत्रीचा वापर करणे अनिवार्य झाले आहे. उन्हाचा पारा वाढल्याने ऊसाचा रस, लिंबू सरबत, ताक आणि शीतपेयांच्या गाड्यांवर गर्दी पाहायला मिळत आहे. वाढत्या तापमानाची दखल घेत आरोग्य विभागाने नागरिकांना 'उष्माघाता'पासून सावध राहण्याचे आवाहन केले आहे.दुपारी १२ ते ४ या वेळेत शक्यतो घराबाहेर पडू नये.शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होऊ नये म्हणून पुरेसे पाणी प्यावे.सुती आणि हलके कपडे वापरावेत.हवामान खात्याच्या अंदाजानुसार, पुढील काही दिवसांत तापमानाचा पारा आणखी चढण्याची शक्यता आहे. उष्णतेमुळे शहरातील दैनंदिन वेळापत्रकावर परिणाम झाला असून, कामाच्या वेळाही नागरिकांनी बदलल्या आहेत. वाढत्या उष्णतेमुळे शहरातील दैनंदिन जीवनावर परिणाम होत असल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे.



*अमळनेर : शहरातील सुभाष चौक ते स्टेशन रोडवर दुपारच्या सुमारास शुकशूकाट पहायला मिळाला. (छायाचित्रः रजनीकांत पाटील)*

## नगरपरिषदेच्या कायदेशीर सल्लागारपदी ॲड. सारांश सोनार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : अमळनेर नगरपरिषदेच्या कायदेशीर सल्लागार म्हणून तरुण व अभ्यासू विधीज्ञ ॲड. सारांश सोनार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेतील ठरावानुसार मुख्याधिकारी गणेश शिंदे यांनी नुकतेच त्यांना नियुक्तीचे पत्र प्रदान केले.ॲड. सारांश सोनार हे सध्या मुंबई उच्च न्यायालय आणि अमळनेर येथील न्यायालयात वकिली व्यवसाय करत आहेत. यापूर्वी त्यांची नियुक्ती अर्बन बँकेचे कायदेशीर सल्लागार म्हणूनही झालेली आहे. नगरपरिषदेच्या वतीने दिवाणी व फौजदारी प्रकरणांमध्ये, तसेच जिल्हा सत्र न्यायालय व वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालयातील प्रकरणांमध्ये ते परिषदेची बाजू मांडतील.या नियुक्तीबद्दल त्यांचे राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांकडून कौतुक होत आहे. माजी आमदार शिरीषदादा चौधरी, डॉ. डीगंबर महाले, अँड एस आर पाटील, ॲड. रमाकांत माळी, डॉ. परीक्षित बाविस्कर, प्रा. अशोक पवार, गौतम मोरे, डॉ. अविनाश जोशी, आणि कॉंग्रेस नेते संदीप घोरपडे यांच्यासह अनेकांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## श्री शिवाजी हायस्कूलच्या कर्मचाऱ्यांचे सात महिन्यांपासूनचे रखडले वेतन

### युवा सेनेचा प्रशासनाविरोधात आंदोलनाचा इशारा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेरः येथील तांबेपुरा भागातील श्री शिवाजी हायस्कूलमधील कर्मचाऱ्यांना गेल्या सात महिन्यांपासून वेतन न मिळाल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. ऑगस्ट २०२५ पासून या कर्मचाऱ्यांचे वेतन रखडले आहे. त्यामुळे प्रशासनाविरोधात प्रचंड संताप व्यक्त होत असून, युवा सेनेने (एकनाथराव शिंदे गट) या प्रश्नी आक्रमक पवित्रा घेतला आहे. येत्या ८ दिवसांत वेतन न मिळाल्यास 'शिवसेना स्टाईल' ने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा गुरुवार, दि. ९ एप्रिल रोजी निवेदनाद्वारे दिला आहे.

श्री शिवाजी हायस्कूलमध्ये गेल्या २५ वर्षांहून अधिक काळ प्रामाणिकपणे सेवा देणाऱ्या शिक्षकांचे आणि कर्मचाऱ्यांचे ऑगस्ट २०२५ ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीतील वेतन अद्याप मिळालेले नाही. विशेष म्हणजे, संबंधित वेतनाची बिले लॉगिनमध्ये उपलब्ध असतानाही, केवळ प्रशासकीय उदासीनतेमुळे आणि कोणत्याही ठोस लेखी आदेशाशिवाय ती रोखून धरण्यात आली आहेत, असा गंभीर आरोप युवा सेनेने केला आहे.

वेतन मिळत नसल्याने कर्मचाऱ्यांचे घराचे व इतर कर्जांचे बँकेचे हप्ते थकले आहेत. कौटुंबिक खर्च भागवणे आणि मुलांचे शिक्षण करणेही आता कठीण झाले आहे. राष्ट्र निर्माण करणाऱ्या शिक्षकांवर अशी वेळ येणे ही प्रशासनासाठी शरमेची बाब आहे, युवा सेनेच्या वतीने तालुकाप्रमुख राहुल कंजर, शहरप्रमुख प्रवीण पाटील आदींनी गटशिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन देऊन जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांना कडक इशारा देण्यात आला आहे. या निवेदनाच्या प्रती राज्याचे शिक्षण मंत्री दादाजी भुसे, पालकमंत्री गुलाबराव पाटील आणि जिल्हाधिकारी जळगाव यांनाही माहितीसाठी पाठवण्यात आल्या आहेत.



*अमळनेर : श्री शिवाजी हायस्कूलमधील कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन वेळेत दिले जावे, यासाठी गुरुवारी गटशिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन देताना युवा सेनेचे तालुकाप्रमुख राहुल कंजर, शहरप्रमुख प्रवीण पाटील आदी.*

## 'एमएमआरसी'च्या संचालकपदी गौतम बिऱ्हाडे यांची नियुक्ती

### अमळनेरच्या शिरपेचात मानाचा तुरा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (एमएमआरसी) ने अमळनेरचे सुपुत्र गौतम बिऱ्हाडे यांच्यावर मोठी जबाबदारी सोपवत त्यांची संचालक (प्रकल्प) म्हणून नियुक्ती जाहीर केली आहे. त्यांच्या या नियुक्तीमुळे अमळनेरच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.

बिऱ्हाडे हे अमळनेर येथील जी. एस. हायस्कूलचे माजी विद्यार्थी असून ते वरिष्ठ आयआरएसई अधिकारी आणि नामांकित सिव्हिल इंजिनिअरिंग तज्ज्ञ आहेत. भारतीय रेल्वे आणि मेट्रो रेल प्रकल्पांमध्ये त्यांना ३३ वर्षांहून अधिक अनुभव आहे. त्यांनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पुणे येथून सिव्हिल इंजिनिअरिंगची पदवी तसेच इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बेंगळुरू येथून स्ट्रक्चरल इंजिनिअरिंगमध्ये पदव्युत्तर पदवी संपादन केली आहे.

मोठ्या प्रमाणावर बहुआयामी पायाभूत प्रकल्पांचे नियोजन, डिझाइन, अंमलबजावणी आणि कमिशनिंग यामध्ये त्यांना व्यापक अनुभव आहे. भूमिगत व उन्नत मेट्रो कॉरिडॉर, पूल आणि रेल्वे प्रणालींच्या उभारणीत त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.या नियुक्तीपूर्वी ते महा-मेट्रो, पुणे येथे कार्यकारी संचालक (भूमिगत) म्हणून कार्यरत होते. तसेच मध्य रेल्वेतील विविध महत्त्वाच्या पदांवर त्यांनी यशस्वीपणे काम केले आहे.

वेळेत प्रकल्प पूर्ण करणे, तसेच सुरक्षा व गुणवत्ता मानकांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी ते ओळखले जातात.त्यांचा प्रकल्प व्यवस्थापन, करार प्रशासन आणि अंतर्गत समन्वयातील अनुभव एमएमआरसीच्या प्रकल्प अंमलबजावणीला अधिक बळकटी देईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. एमएमआरसीने त्यांचे स्वागत केले असून चालू व आगामी प्रकल्पांना दिशा देण्यासाठी त्यांच्या नेतृत्वाची अपेक्षा व्यक्त केली आहे. त्यांच्या या यशाबद्दल अमळनेर येथील मित्रपरिवार व नागरिकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.



*अमळनेर : मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या संचालकपदी गौतम बिऱ्हाडे यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांना सन्मानित करताना व्यवस्थापकीय संचालिका श्रीमती अश्विनीताई भिडे.*

सर्वसामान्यांना मोठा दिलासा!

## पेट्रोल-डिझेलच्या दरात मोठी घसरण होण्याची शक्यता

### अमेरिका- इराण यांच्यातील युद्धविराम कराराच्या घोषणेनंतर तज्ज्ञांचा अंदाज

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : गेल्या अनेक दिवसांपासून महागाईच्या झळा सोसणाऱ्या सर्वसामान्यांसाठी एक अत्यंत दिलासादायक बातमी समोर आली आहे. अमेरिका आणि इराण यांच्यात दोन आठवड्यांच्या युद्धविराम कराराची घोषणा करण्यात आली आहे. यामुळे जागतिक बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी घसरण झाली आहे. परिणामी, भारतातही लवकरच पेट्रोल आणि डिझेलचे दर स्वस्त होण्याची शक्यता विविध तज्ज्ञांकडून वर्तवण्यात येत आहे.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी या युद्धविरामाची घोषणा केल्यानंतर जागतिक तेल बाजारावर याचे सकारात्मक परिणाम दिसून आले आहेत. कच्च्या तेलाच्या किमतीत तब्बल १५ टक्क्यांपर्यंत घट झाली आहे. ब्रेंट क्रूडची किंमत प्रति बॅरल १०० डॉलरच्या खाली आली आहे.वेस्ट टेक्सास इंटरमीडिएट प्रति बॅरल ९५ डॉलर्सवर पोहोचले आहे.युद्धविरामामुळे इंधनाचा पुरवठा करणाऱ्या महत्त्वाच्या मार्गावरील तणाव कमी झाला असून, पुरवठा साखळी पुन्हा पूर्ववत होण्यास मदत होणार आहे.




हॉर्मुझ सामुद्रधुनीतून वाहतूक सुरू होणार युद्धविराम करारानुसार, जगातील इंधन वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या 'हॉर्मुझ सामुद्रधुनी'तून ऑईल टँकर्सची वाहतूक आता सुरक्षितपणे पार पडणार आहे. दोन आठवड्यांच्या या कालावधीत इराणमधून होणारी कच्च्या तेलाची निर्यात सुरळीत होईल. यामुळे जगभरातील अनेक देशांसमोर उभे राहिलेले इंधन संकट आता दूर होणार आहे. युद्धविराम भारतासाठी विशेष महत्त्वाचा ठरला आहे. इराण-अमेरिका संघर्षामुळे हॉर्मुझ सामुद्रधुनीतून होणारी वाहतूक विस्कळीत झाली होती, ज्याचा थेट परिणाम भारताला मिळणाऱ्या कच्च्या तेलावर झाला होता.

### इंधन पुरवठा सुरळीत होणार

देशात पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीचा तुटवडा निर्माण होण्याची भीती निर्माण झाली होती. मात्र, आता पुरवठा सुरळीत होणार असल्याने भारतातील इंधन साठा आणि वितरण व्यवस्था पुन्हा एकदा रुळावर येईल.कच्च्या तेलाच्या किमतीत झालेल्या १५ टक्क्यांच्या घसरणीचा फायदा थेट भारतीय ग्राहकांना मिळण्याची शक्यता आहे. तेल कंपन्या जागतिक दरांचा आढावा घेऊन लवकरच नवीन किमती जाहीर करू शकतात. यामुळे मालवाहतूक स्वस्त होऊन इतर जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीही कमी होण्याची चिन्हे आहेत.

आजचे अभीष्टचिंतन





**श्री. जयेंद्र वैद्य**
पुरोहित, श्री मंगळग्रह मंदिर



**श्री. सुरेश कुंदनानी**
संचालक : विपूल गारमेंट



**श्री. मिलिंद पाटील**
अमळगाव (ता. अमळनेर)

### दिनविशेष

१० एप्रिल

- राष्ट्रीय भावंड दिन
- जागतिक होमिओपॅथी दिवस
- भारताचा पहिला उपग्रह इनसॅट वन अवकाशात सोडण्यात आला.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

## खानदेश शिक्षण मंडळाच्या सहचिटणीसपदी डॉ. व्ही. बी. मांटे यांची निवड

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील खानदेश शिक्षण मंडळाच्या नवनियुक्त सहसचिवपदी प्रा. डॉ . व्ही. बी. मांटे (उपप्राचार्य, प्रताप महाविद्यालय) यांची निवड झाली आहे. या निवडीबद्दल प्रताप महाविद्यालया नुकताच त्यांचा सत्कार करण्यात आला. सिनेट सदस्य प्रा. डॉ. धीरज वैष्णव, प्रताप महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. हर्षवर्धन जाधव, एन. मुक्टो प्राध्यापक संघटनेच्या स्थानिक युनिटचे सचिव डॉ. विजय तुंटे, उपप्राचार्य डॉ. ए. जे. पाटील, प्राध्यापक प्रतिनिधी प्रा. दिनेश भलकार आदी उपस्थित होते.

## संपादकीय

# राजकारणाला नवी दिशा...



महाराष्ट्रातील बारामती आणि राहुरी या विधानसभांच्या पोटनिवडणुका केवळ जागा भरण्यापुरत्या मर्यादित नसून, त्या सध्याच्या राजकीय परिस्थितीचा आरसा ठरत आहेत. या निवडणुकांमधून राज्यातील आघाड्यांचे स्वरूप, पक्षांतील अंतर्गत समन्वय, तसेच नेतृत्वाची परिपक्वता यांचे मूल्यमापन होणार आहे. विशेषतः बारामतीसारख्या संवेदनशील मतदारसंघात घडणाऱ्या घडामोडींकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागलेले आहे. बारामती हा मतदारसंघ पवार कुटुंबाच्या राजकीय वारशाशी निगडित असल्याने येथे होणारी प्रत्येक हालचाल ही केवळ राजकीय नसून भावनिक देखील असते. अजितदादा पवार यांच्या अकाली निधनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत शरद पवार यांनी संयमाची भूमिका घेत निवडणूक न लढविण्याचा निर्णय घेतला, हा एकप्रकारे राजकीय संस्कारांचा आदर्श नमुना म्हणावा लागेल. मात्र, काँग्रेसने स्वतंत्र उमेदवार देण्याचा निर्णय घेतल्याने महाविकास आघाडीतील समन्वयाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आघाडीतील घटक पक्षांनी एकत्र राहून लढण्याची अपेक्षा असताना अशा प्रकारचे निर्णय घेतले जातात तेव्हा त्याचा परिणाम मतदारांवर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. राजकारणात मतभेद असणे हे स्वाभाविक आहे, पण त्या मतभेदांचे व्यवस्थापन कसे केले जाते, हे अधिक महत्त्वाचे ठरते. शरद पवार यांनी यासंदर्भात केलेले वक्तव्य लक्षवेधी आहे. त्यांनी स्पष्ट केले, की एखाद्या मतदारसंघातील अडचणी या राष्ट्रीय प्रश्न मानता येत नाहीत. या विधानातून त्यांनी परिस्थिती शांत ठेवण्याचा प्रयत्न केला असला, तरी यामध्ये आघाडीतील पक्षांना दिलेला सूचक इशारा देखील दडलेला आहे. एकत्र येऊन सत्तेत असलेल्या पक्षांनी परस्पर विश्वास टिकविणे आणि समन्वय साधणे ही काळाची गरज आहे.

राहुरी मतदारसंघातील परिस्थिती देखील तितकीच गुंतागुंतीची आहे. येथे प्राजक्त तनपुरे यांच्या माघारीनंतर निर्माण झालेली परिस्थिती आणि त्यानंतर स्थानिक पातळीवर घेतलेला उमेदवारीचा निर्णय, यावरून पक्षांच्या अंतर्गत रचनेतील बदल स्पष्टपणे दिसून येतात. स्थानिक नेतृत्वाला दिलेले महत्त्व ही सकारात्मक बाब असली, तरी त्यातून निर्माण होणारी गोंधळाची परिस्थिती टाळणे आवश्यक आहे. अन्यथा, मतदारांमध्ये संभ्रम निर्माण होऊन त्याचा परिणाम निवडणुकीच्या निकालावर होऊ शकतो. या संपूर्ण प्रक्रियेत नेतृत्वाच्या परिपक्वतेचा मुद्दा अत्यंत महत्त्वाचा ठरतो. शरद पवार यांनी पार्थ पवार यांच्याबाबत केलेले वक्तव्य हे केवळ वैयक्तिक टीका नसून, राजकारणातील जबाबदारीची जाणीव करून देणारे आहे. सार्वजनिक जीवनात व्यक्त होणाऱ्या प्रत्येक वक्तव्याचा परिणाम व्यापक पातळीवर होतो. त्यामुळे राजकीय नेत्यांनी संयम आणि समजूतदारपणा दाखविणे आवश्यक आहे. परिपक्वता ही केवळ अनुभवावर अवलंबून नसून, परिस्थितीचे भान ठेवून योग्य भूमिका घेण्यातून दिसून येते. विलिनीकरणाच्या चर्चेवरही शरद पवार यांनी स्पष्ट भूमिका घेतली आहे. अजितदादा पवार यांच्या निधनानंतर या चर्चेला पूर्णविराम मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

यावरून सध्याच्या घडीला राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) आपली स्वतंत्र ओळख टिकवून ठेवण्याच्या भूमिकेत आहे, हे स्पष्ट होते. तसेच दुसऱ्या गटाच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप न करण्याची भूमिका त्यांनी मांडली आहे. ही भूमिका राजकीयदृष्ट्या महत्त्वाची ठरू शकते. कारण त्यामुळे भविष्यातील आघाड्यांचे स्वरूप ठरवण्यात लवचिकता राखता येईल. एकूणच बारामती आणि राहुरी पोटनिवडणुका या राज्याच्या राजकारणातील बदलत्या प्रवाहाचे संकेत देणाऱ्या ठरत आहेत. या निवडणुकांमधून केवळ विजयी उमेदवार ठरणार नाही, तर पक्षांतील अंतर्गत एकजूट, नेतृत्वाची दिशा आणि मतदारांचा कल यांचेही स्पष्ट चित्र समोर येईल. मतदारांसाठी ही निवडणूक केवळ प्रतिनिधी निवडण्याची प्रक्रिया नसून, भविष्यातील राजकीय स्थैर्याचा निर्णय घेणारी आहे. राजकीय पक्षांनी या निवडणुकांकडे केवळ स्पर्धा म्हणून न पाहता आत्मपरीक्षणाची संधी म्हणून पाहणे गरजेचे आहे. आघाड्यांतील मतभेद दूर करून एकत्रितपणे पुढे जाण्याचा प्रयत्न केल्यासच मतदारांचा विश्वास टिकविता येईल. अन्यथा अंतर्गत विसंवाद आणि असमंजसपणामुळे निर्माण होणारी नकारात्मक प्रतिमा पक्षांसाठी घातक ठरू शकते. शेवटी या पोटनिवडणुका राज्यातील राजकारणाला नवी दिशा देणाऱ्या ठरतील, यात शंका नाही. परिपक्व नेतृत्व, स्पष्ट धोरण आणि समन्वयाची भूमिका यावरच या निवडणुकांचे भवितव्य अवलंबून असेल. मतदारांनीही जागरूकपणे निर्णय घेतल्यास या निवडणुका लोकशाहीची ताकद अधोरेखित करणाऱ्या ठरतील.

# शेतकरी केंद्रित विकासाची दिशा देणारे : डॉ. पंजाबराव देशमुख

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय कृषीक्षेत्राच्या उन्नतीसाठी आयुष्य वाहून घेणारे, शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी सातत्याने लढणारे आणि



शिक्षणप्रेमी समाजसुधारक म्हणून ओळखले जाणारे डॉ. पंजाबराव देशमुख यांचे नाव भारतीय इतिहासात अत्यंत आदराने घेतले जाते. त्यांचा १० एप्रिल रोजी स्मृतिदिन. यानिमित्त त्यांच्या कार्याचा आणि विचारांचा आढावा घेणे म्हणजे ग्रामीण भारताच्या विकासाचा मार्ग समजून घेण्याची एक संधी आहे.

**स्मृतिदिन विशेष**

### प्रारंभिक जीवन आणि शिक्षण

डॉ. पंजाबराव देशमुख यांचा जन्म २७ डिसेंबर १८९८ रोजी महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यात झाला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी शिक्षण घेतले आणि आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर उच्च शिक्षणासाठी परदेशातही गेले. त्यांनी कायदा आणि अर्थशास्त्र या विषयांत प्रावीण्य मिळविले.

### कृषी आणि शेतकरी हितासाठी योगदान

डॉ. देशमुख यांचे संपूर्ण आयुष्य शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी समर्पित होते. त्यांनी शेतकऱ्यांच्या समस्या जवळून जाणून घेतल्या आणि त्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी विविध उपाययोजना केल्या. त्यांनी कृषी धोरणांमध्ये सुधारणा करण्यावर भर दिला.

### भारताचे पहिले कृषिमंत्री

स्वातंत्र्यानंतर पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या मंत्रिमंडळात डॉ. देशमुख यांची देशाच्या पहिल्या कृषिमंत्रिपदी नियुक्ती झाली. या पदावर कार्य करताना त्यांनी कृषी क्षेत्रात अनेक महत्त्वपूर्ण धोरणे राबवली. शेतकऱ्यांना कर्जसुविधा, सिंचन व्यवस्था आणि आधुनिक शेती तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्यावर त्यांनी भर दिला.

### शिक्षण क्षेत्रातील कार्य

डॉ. देशमुख यांनी शिक्षणाच्या प्रसारासाठीही मोठे योगदान दिले. त्यांनी श्री शिवाजी शिक्षण संस्था या संस्थेची स्थापना केली. या संस्थेमार्फत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध झाली.

### सामाजिक सुधारणा आणि विचार

ते केवळ कृषी तज्ज्ञ नव्हते, तर एक समाजसुधारकही होते. त्यांनी सामाजिक समता, शिक्षणाचा प्रसार आणि ग्रामीण विकास यांवर विशेष भर दिला. त्यांच्या कार्यात समाजातील वंचित घटकांच्या उन्नतीची तळमळ दिसून येते.

### आजच्या काळातील महत्त्व

आजही शेतकरी आत्महत्या, कृषी संकट आणि ग्रामीण विकास यांसारख्या समस्यांवर उपाय शोधताना डॉ. देशमुख यांचे विचार मार्गदर्शक ठरतात. शाश्वत शेती, शिक्षण आणि सहकार यांवर त्यांनी दिलेला भर आजही तितकाच महत्त्वाचा आहे. डॉ. पंजाबराव देशमुख हे दूरदृष्टी असलेले नेते, तज्ज्ञ आणि समाजसेवक होते. त्यांच्या कार्यातून आपल्याला शेतकरी-केंद्रित विकासाची दिशा मिळते. त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या विचारांचा अंगीकार करून समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी प्रयत्न करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

# रस्त्याच्या दुरवस्थेने दुकानदार हैराण

## मीनाताई ठाकरे शॉपिंग कॉम्प्लेक्ससमोरील परिस्थिती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेरः शहरातील मुख्य बाजारपेठेत असलेल्या मीनाताई ठाकरे शॉपिंग कॉम्प्लेक्ससमोरील रस्त्याची अक्षरशः चाळण झाली आहे. यामुळे स्थानिक दुकानदार आणि नागरिक प्रचंड त्रस्त झाले आहेत. या रस्त्यावर गेल्या काही दिवसांपूर्वी मोठ्या प्रमाणात खड्डे पडले होते. दुकानदार व परिसरातील नागरिकांच्या वारंवार तक्रारी होऊ लागल्याने पालिकेकडून खड्डे बुजविण्यात आले. परंतू रस्त्यावर टाकलेल्या बारीक कचमुळे धुराळा उडत असल्याने तो दुकानदारांसह नागरिकांना त्रासदायक बनला आहे.

या प्रश्नी दुकानदारांनी एकत्र येत नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देऊन तातडीने रस्ता दुरुस्तीची मागणी केली आहे.मिनाताई ठाकरे शॉपिंग कॉम्प्लेक्ससमोरील रस्ता पूर्णपणे उखडला असून त्यावर मोठे खड्डे पडले आहेत. या खड्ड्यांमुळे परिसरात वाहनांची वर्दळ वाढली की प्रचंड प्रमाणात धूळ उडते. ही धूळ दुकानांमध्ये जात असल्याने मालाचे नुकसान होत आहेच, शिवाय दुकानदार आणि ग्राहकांच्या आरोग्याचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. श्वसनाचे विकार जडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.



*अमळनेर : मिनाताई ठाकरे शॉपिंग कॉम्प्लेक्ससमोरील दुरावस्था झालेला रस्ता. (छायाचित्रः रजनीकांत पाटील)*

या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी संकुलातील सर्व दुकानदारांच्या वतीने मुख्याधिकाऱ्यांना लेखी पत्र देण्यात आले आहे. "रस्त्याची अवस्था अतिशय खराब झाली असून तातडीने उपाययोजना कराव्यात, किमान तात्पुरते डांबरीकरण करून धुळीचा त्रास थांबवावा," अशी नम्र विनंती या पत्राद्वारे करण्यात आली आहे.या निवेदनावर किशोर प्रभाकर बारी, प्रकाश राठोड, भूषण चुंबळेकर, दिनू शिरोडे, अभीन शहा, रवी भावसार, चौधरी सर आणि पंकज वाणी यांच्यासह अनेक दुकानदारांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# आयटीआय उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी

## १३ एप्रिलला राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी मेळावा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जिल्ह्यातील बेरोजगार तरुण आणि तांत्रिक शिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांसाठी एक मोठी संधी चालून आली आहे. पंतप्रधान राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी योजनेतंर्गत जळगाव येथे भव्य भरती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा सोमवार, दिनांक १३ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आला आहे.शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नॅशनल हायवे क्रमांक-६, तंत्रनिकेतन समोर, जळगाव, सकाळी १०:०० वाजेपासून मेळावा सुरु होणार आहे.या मेळाव्यात जिल्ह्यातील तसेच जिल्ह्याबाहेरील अनेक नामांकित कंपन्या सहभागी होणार असून, त्याद्वारे पात्र उमेदवारांची शिकाऊ उमेदवारीसाठी निवड केली जाईल. १० वी, १२ वी उत्तीर्ण, आयटीआय विविध व्यवसायांचे प्रशिक्षण पूर्ण केलेले उमेदवार,डिप्लोमा,आणि पदवीधर अशी शैक्षणिक पात्रता असलेले उमेदवार या मेळाव्यासाठी पात्र आहेत.या भरती मेळाव्याचा लाभ घेण्यासाठी इच्छुक उमेदवारांनी केंद्र सरकारच्या अधिकृत पोर्टलवर नोंदणी करणे अनिवार्य आहे.याकरिता www.apprenticeshipindia.org या संकेतस्थळावर नोंदणी केलेल्या पात्र उमेदवारांनीच वरील दिलेल्या दिनांक आणि वेळेत उपस्थित राहावे.सहायक प्रशिक्षण सल्लागार, मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र (BTRI), जळगाव यांच्या वतीने या मेळाव्याचे नियोजन करण्यात आले आहे. तांत्रिक शिक्षण पूर्ण केलेल्या जास्तीत जास्त उमेदवारांनी या संधीचा लाभ घेऊन आपल्या करिअरला दिशा द्यावी, असे आवाहन सहायक प्रशिक्षण सल्लागार कार्यालयाकडून प्रसिद्धी पत्रकाद्वारे करण्यात आले आहे.

# अमळनेरमध्ये सोंडदचे झाड कोसळले

## दुचाकीचे मोठे नुकसान; अनर्थ टळला

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील भगवा चौक परिसरात महालक्ष्मी प्रोव्हिजनसमोर मंगळवारी दुपारी सुमारे 2 वाजेच्या सुमारास सोंडदचे मोठे झाड अचानक कोसळल्याची घटना घडली. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र झाडाखाली अडकून एका मोटारसायकलचे मोठे नुकसान झाले.याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, एमएच 18 बीएफ 2401 या क्रमांकाची अजिंक्य पाटील यांची बजाज कंपनीची मोटारसायकल झाडाखाली दबली गेल्याने तिचे मोठे नुकसान झाले. संबंधित परिसरात विद्यार्थ्यांची नेहमीच वर्दळ असते तसेच नागरिकांची मोठ्या प्रमाणात ये-जा सुरू असते. दुपारच्या वेळी वर्दळ कमी असल्यामुळे मोठा अनर्थ टळल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. दरम्यान, झाड कोसळल्यानंतर भगवा चौक परिसरातील वीजपुरवठा काही काळासाठी खंडित झाला होता. त्यामुळे स्थानिकांना काही काळ गैरसोयींचा सामना करावा लागला. घटनेची माहिती मिळताच उपनगराध्यक्ष प्रशांत निकम यांनी तात्काळ संबंधित यंत्रणेला झाड हटविण्याच्या



सूचना दिल्या. त्यानंतर अल्पावधीतच झाड हटवून मार्ग वाहतुकीसाठी मोकळा करण्यात आला. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरात वारंवार वादळी वारे वाहत असल्याने धोकादायक व जीर्ण झाडांची तातडीने पाहणी करून त्यांची छाटणी अथवा तोड करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. प्रशासनाने याबाबत गांभीर्याने दखल घेण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

# बुमराहची १५ वर्षीय सूर्यवंशीकडून धुलाई

## हार्दिकच्या निर्णयांवर भडकला रोहित; नेमके काय घडले?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आयपीएलचा सर्वात मोठा पीक पाईंट कोणता असेल, तर तो गुवाहाटीच्या मैदानात पाहायला मिळाला. १५ वर्षीय वैभव सूर्यवंशीने जगातील नंबर १ टी-२० बॉलर असलेल्या जसप्रीत बुमराहला पहिल्याच बॉलवर सिक्स मारला अन् सर्वांचे डोळे उघडेच्या उघडे राहिले. एकाच ओव्हरमध्ये दोन सिक्स मारून वैभवने आपल्या आंतरराष्ट्रीय आगमासाठी रणशिंग फुंकले. वैभवने बुमराहच्या दोन्ही ओव्हर चोपल्या. यानंतर रोहित शर्मा चांगलाच भडकल्याचे पाहावयास मिळाले.

### हार्दिकच्या निर्णयांवर रोहित नाराज?



मैदानावर कर्णधार म्हणून हार्दिक पांड्याकडून होत असलेल्या चुकीच्या निर्णयांवर रोहित शर्मा पूर्णपणे नाखूश असल्याचे गुवाहाटीच्या मैदानात प्रकर्षाने जाणवले. हार्दिकच्या काही निर्णयांवर रोहित शर्माने जाहीरपणे नाराजी व्यक्त केल्याचे कॅमेऱ्यात कैद झाले आहे. त्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर चर्चेता विषय ठरला आहे. रोहित आणि हार्दिकची बॉन्डिंग चांगली असल्याने बुमराहच्या ओव्हर चोपल्या गेल्यानंतर रोहितने उघडपणे हात वर करत नाराजी व्यक्त केल्याचा व्हिडिओ समोर आला आहे.

मैदानात असलेला अनुभवी रोहित शर्मा वारंवार हार्दिकला काही सुचविताना दिसला. मात्र, जेथे चूक होत आहे, तेथे रोहित शर्मा माफी देत नाही. तीन ओव्हरमध्ये ५० धावा केल्यानंतर रोहित शर्माने थेट हात वर करत नाराजी व्यक्त केली होती. कारण बुमराहच्या बॉलिंगनुसार फिल्डिंग सेटअप केला गेला नव्हता.

# पार्थ पवारांचा शपथेवेळी अजितदादांसारखा 'लूक'

## गुलाबी जॅकेट परिधानाची राज्यसभेत चर्चा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



पार्थ पवार यांनी नुकतीच राज्यसभेच्या खासदारकीची शपथ घेतली. पार्थ पवारांच्या खासदारकीच्या शपथेवेळी उपमुख्यमंत्री आणि आई श्रीमती सुनेत्राताई पवार यांच्यासह पक्षाचे नेते प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे देखील दिल्लीत उपस्थित होते. अजितदादा पवार ज्या पद्धतीने गुलाबी जॅकेट परिधान करायचे त्याचपद्धतीचे जॅकेट घालून पार्थ पवार यांनी राज्यसभेच्या खासदारकीची शपथ घेतली. पार्थ पवार यांनी इंग्रजीत खासदारकीची शपथ घेतली.

पार्थ पवारांनी परिधान केलेले कपडे दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवारांची आठवण करून देणारे होते. त्यामुळे पार्थ पवारांच्या या 'लूक'ची सध्या राज्यभर चर्चा रंगली आहे. पार्थ पवार यांच्या या पहिल्याच संसदेतील प्रवेशामुळे, महाराष्ट्राच्या राजकारणातील प्रतिनिधित्व देशपातळीवर प्रबळ होणार आहे. यापूर्वी शरद पवार यांनीही राज्यसभेची शपथ घेतली असून, पवार कुटुंबातील तीन पिढ्या आता संसदेत सक्रिय असल्याचे दिसत आहे.

# उन्हाळी सुट्ट्यांमध्ये एसटी प्रवास महागणार

## १५ एप्रिलपासून १० टक्के भाडेवाढ लागू

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : राज्य परिवहन महामंडळाने उन्हाळी सुट्ट्यांच्या पार्श्वभूमीवर एक महत्त्वाचा निर्णय जाहीर केला आहे. १५ एप्रिलपासून एसटीच्या तिकीट दरांमध्ये १० टक्के वाढ लागू होणार आहे. या वाढीमुळे सुट्ट्यांमध्ये गावाकडे जाणाऱ्या प्रवाशांना आता अधिक पैसे मोजावे लागतील. विशेषतः लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी सुमारे ९० ते १०० रुपयांपर्यंत अतिरिक्त भार पडण्याची शक्यता आहे. या भाडेवाढीनुसार मुंबई-पुणे प्रवासात साध्या एसटीसाठी आता ३१४ रुपये लागतील, ज्यात २ रुपये स्वच्छता अधिभार देखील समाविष्ट आहे.महामंडळाने दिलेल्या माहितीनुसार, उन्हाळ्यात प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेऊन उत्पन्न वाढवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. ही तात्पुरती भाडेवाढ केवळ दोन महिन्यांसाठी, म्हणजे १५ एप्रिल ते १५ जून या कालावधीसाठी लागू असेल. साध्या, मिडी आणि जलद बस सेवांना ही वाढ लागू होईल. मात्र, हिरकणी, शयनयान, शिवशाही, जनशिवनेरी, शिवनेरी या गाड्यांसह ई-बसच्या तिकीट दरात कोणताही बदल करण्यात आलेला नाही, त्यामुळे या सेवा वापरणाऱ्या प्रवाशांना दिलासा मिळणार



आहे.दरम्यान, विद्यार्थी पास तसेच मासिक पासधारकांना या दरवाढीचा परिणाम होणार नाही. नियमित प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांना यामुळे अतिरिक्त आर्थिक ताण जाणवणार नाही, असेही महामंडळाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. महिला सन्मान योजना (महिलांसाठी ५०% सवलत) आणि अमृत ज्येष्ठ नागरिक योजना (ज्येष्ठ नागरिकांसाठी १००% सवलत) यांसारख्या योजना सुरूच राहतील, त्यांना या वाढीचा फटका बसणार नाही.या भाडेवाढीव्यतिरिक्त, महामंडळाने प्रति तिकिटामागे दोन रुपये असा स्वच्छता अधिभार घेण्याचा निर्णय घेतला आहे, जो १४ एप्रिलच्या मध्यरात्रीपासून लागू होणार आहे. एसटी गाड्यांसह स्थानके आणि आगारांच्या स्वच्छतेसाठी कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात येणार असून, त्यासाठी हा अधिभार आकारला जाईल. हा अधिभार सवलतधारी प्रवाशांना लागू होणार नाही.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



होमिओपॅथी दिन विशेष

# सुरक्षित आणि प्रभावी उपचारपद्धती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दरवर्षी १० एप्रिल हा दिवस 'जागतिक होमिओपॅथी दिन' म्हणून साजरा केला जातो. या दिवशी होमिओपॅथी उपचारपद्धतीचे जनक डॉ. सॅम्युएल हॅनिमन यांची जयंती असते. त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी आणि होमिओपॅथीबद्दल जनजागृती करण्यासाठी हा दिवस विशेष महत्त्वाचा मानला जातो.

### होमिओपॅथी म्हणजे काय?

होमिओपॅथी ही एक पर्यायी वैद्यकीय पद्धत आहे जी 'समान समानाला बरे करते' या तत्त्वावर आधारित आहे. म्हणजेच ज्या पदार्थामुळे एखाद्या निरोगी व्यक्तीत विशिष्ट लक्षणे निर्माण होतात, त्याच पदार्थाचे सूक्ष्म प्रमाण रुग्णाला दिल्यास तीच लक्षणे बरी होतात, असा यामागचा विचार आहे.

### इतिहास आणि विकास

डॉ. हॅनिमन यांनी १८ व्या शतकात या उपचारपद्धतीचा शोध लावला. त्यांनी पारंपरिक औषधोपचारातील दुष्परिणाम टाळण्यासाठी अधिक सुरक्षित आणि सौम्य पद्धतीचा शोध घेतला. त्यांच्या संशोधनातून होमिओपॅथीची निर्मिती झाली आणि आज ती जगभरात लोकप्रिय झाली आहे.



### होमिओपॅथीची वैशिष्ट्ये


नैसर्गिक आणि सुरक्षित उपचार : होमिओपॅथिक औषधे नैसर्गिक घटकांपासून तयार केली जातात.
दुष्परिणामांचा अभाव : योग्य प्रमाणात घेतल्यास यांचे दुष्परिणाम अत्यल्प असतात.
व्यक्तिनिष्ठ उपचारपद्धती : प्रत्येक रुग्णाच्या शारीरिक आणि मानसिक स्थितीनुसार औषध दिले जाते.
दीर्घकालीन आजारांवर प्रभावी : ॲलर्जी, दमा, त्वचारोग, पचनसंस्था विकार इत्यादींवर यशस्वीपणे वापरली जाते.

### आधुनिक काळातील महत्त्व

आजच्या धावपळीच्या जीवनात लोकांना सुरक्षित आणि नैसर्गिक उपचारपद्धतींची गरज भासत आहे. त्यामुळे होमिओपॅथीचा स्वीकार मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. भारतातही या पद्धतीला शासनमान्यता मिळालेली आहे आणि अनेक शासकीय तसेच खासगी रुग्णालयांमध्ये होमिओपॅथिक उपचार उपलब्ध आहेत.

### जनजागृतीची गरज

होमिओपॅथीबद्दल अनेक गैरसमज अजूनही समाजात आढळतात. काही लोकांना ही पद्धत धीमी वाटते, परंतु योग्य निदान आणि नियमित औषधोपचार केल्यास ती प्रभावी ठरते. त्यामुळे होमिओपॅथी दिनाच्या निमित्ताने या उपचारपद्धतीबद्दल योग्य माहिती लोकांपर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे. होमिओपॅथी ही एक सुरक्षित, प्रभावी आणि नैसर्गिक उपचारपद्धती आहे जी संपूर्ण आरोग्याकडे लक्ष देते. जागतिक होमिओपॅथी दिन हा केवळ एक दिवस नसून, आरोग्याच्या या पर्यायी मार्गाचा स्वीकार करण्यासाठी एक प्रेरणादायी संधी आहे. या दिवसाच्या निमित्ताने आपण सर्वांनी आरोग्याबाबत जागरूक राहून योग्य उपचारपद्धतीचा अवलंब करणे गरजेचे आहे.




# व्यवहार्य धोरणांवर भर देणारे डॉ. धनंजय गाडगीळ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जन्मदिन विशेष

भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासात मोलाचे योगदान देणाऱ्या महान अर्थतज्ज्ञांमध्ये डॉ. धनंजय रामचंद्र गाडगीळ यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. त्यांच्या विचारांनी आणि धोरणांनी भारताच्या नियोजन प्रक्रियेला दिशा दिली. त्यांची १० एप्रिल रोजी जयंती. यानिमित्त त्यांच्या कार्याचा आणि विचारांचा आढावा घेणे महत्त्वपूर्ण बाब आहे.

### प्रारंभिक जीवन आणि शिक्षण

डॉ. धनंजय गाडगीळ यांचा जन्म १० एप्रिल १९०१ रोजी झाला. लहानपणापासूनच त्यांना शिक्षणाची आवड होती. त्यांनी अर्थशास्त्र विषयात उच्च शिक्षण घेतले आणि आपल्या अभ्यासपूर्ण दृष्टिकोनामुळे ते लवकरच एक प्रख्यात अर्थतज्ज्ञ म्हणून ओळखले जाऊ लागले.

### शैक्षणिक आणि व्यावसायिक कार्य

डॉ. गाडगीळ यांनी पुण्यातील 'गोखले अर्थशास्त्र संस्था' या प्रतिष्ठित संस्थेचे नेतृत्व केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली या संस्थेने अर्थशास्त्र संशोधनात मोठी प्रगती केली. त्यांनी ग्रामीण अर्थव्यवस्था, शेती, सहकार आणि नियोजन या क्षेत्रांवर सखोल अभ्यास केला.



### 'गाडगीळ सूत्र' : विकासाचा नवा दृष्टिकोन

भारताच्या पंचवार्षिक योजनांमध्ये संसाधनांचे राज्यांमध्ये वाटप करण्यासाठी त्यांनी मांडलेले 'गाडगीळ सूत्र' अत्यंत महत्त्वाचे ठरले. या सूत्रामुळे राज्यांमध्ये संतुलित विकास साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. सामाजिक आणि आर्थिक विषमता कमी करण्यासाठी त्यांच्या या संकल्पनेचा मोठा प्रभाव पडला.

### ग्रामीण विकासासाठी योगदान

डॉ. गाडगीळ यांचा ठाम विश्वास होता की भारताचा विकास ग्रामीण भागाच्या प्रगतीशिवाय शक्य नाही. त्यांनी सहकार चळवळीला चालना दिली आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी विविध उपाय सुचवले. त्यांच्या विचारांमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी मिळाली.

### धोरणनिर्मितीत भूमिका

डॉ. गाडगीळ यांनी नियोजन आयोगासह अनेक शासकीय समित्यांमध्ये काम करताना देशाच्या आर्थिक धोरणांवर प्रभाव टाकला. त्यांनी व्यवहार्य आणि लोकाभिमुख धोरणांवर भर दिला. त्यांच्या विचारांमध्ये समतोल, न्याय आणि सर्वसमावेशक विकासाचा दृष्टिकोन स्पष्ट दिसतो.

### आजच्या काळातील महत्त्व

आजच्या जागतिकीकरणाच्या युगातही डॉ. गाडगीळ यांचे विचार तितकेच उपयुक्त आहेत. आर्थिक विषमता, ग्रामीण-शहरी दरी आणि संसाधनांचे योग्य वाटप यांसारख्या प्रश्नांवर त्यांच्या तत्त्वांचा उपयोग होऊ शकतो. डॉ. धनंजय गाडगीळ हे केवळ एक अर्थतज्ज्ञ नव्हते, तर ते दूरदृष्टी असलेले विचारवंत आणि समाजाभिमुख धोरणकर्ते होते. त्यांच्या कार्यातून आपल्याला विकासाचा समतोल आणि न्याय्य मार्ग शिकायला मिळतो. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या विचारांचा अंगीकार करून देशाच्या प्रगतीसाठी योगदान देणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

राष्ट्रीय भावंड दिन विशेष

# नात्यातील घट्ट बंधांचे स्मरण

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मानवी आयुष्यातील सर्वांत निरागस, निखळ आणि जिव्हाळ्याचे नाते म्हणजे भावंडांचे नाते. दरवर्षी १० एप्रिल हा दिवस 'राष्ट्रीय भावंड दिन' म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे महत्त्व म्हणजे आपल्या भावंडांप्रती असलेले प्रेम, आपुलकी आणि नात्यातील घट्ट बंध यांचे स्मरण करणे.

बालपणापासून ते आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर भावंडे आपली सोबत करतात. लहानपणीचे खेळ, भांडणे, गुपिते आणि आनंदाचे क्षण हे सर्व भावंडांसोबतच अनुभवले जातात. हे नाते केवळ रक्ताचे नसून, विश्वास, समजूतदारपणा आणि नि:स्वार्थ प्रेम यांवर आधारित असते.

### संस्कार आणि व्यक्तिमत्त्व घडवण्यात भूमिका

भावंडे एकमेकांचे पहिले मित्र आणि मार्गदर्शक असतात. मोठी भावंडे लहानांना जीवनातील धडे शिकवतात, तर लहान भावंडे मोठ्यांच्या आयुष्यात आनंद आणि उत्साह निर्माण करतात. एकत्र वाढताना सहकार्य, वाटून घेणे, समजूतदारपणा आणि संयम यांसारखे महत्त्वाचे गुण विकसित होतात.

### भारतीय संस्कृतीतील स्थान


भारतीय संस्कृतीत भावंडांच्या नात्याला विशेष महत्त्व आहे. 'रक्षाबंधन' आणि 'भाऊबीज' यांसारख्या सणांमधून या नात्याचा सन्मान केला जातो. या परंपरा भावंडांमधील प्रेम आणि संरक्षणाच्या भावनेला अधिक बळकट करतात.

### आधुनिक काळातील बदल

आजच्या डिजिटल युगात जीवनशैली बदलली असली तरी भावंडांमधील नात्याचे महत्त्व अजूनही तितकेच आहे. भौगोलिक अंतर वाढले असले तरी फोन, व्हिडिओ कॉल आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून भावंडे एकमेकांशी जोडलेली राहतात. व्यस्त दिनचर्येतही एकमेकांसाठी वेळ काढणे हे नात्याला अधिक दृढ करते.

### भावंड दिन साजरा करण्याचे महत्त्व

राष्ट्रीय भावंड दिन हा केवळ साजरा करण्याचा दिवस नाही, तर आपल्या भावंडांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी आहे. या दिवशी एक छोटा संदेश, भेटवस्तू किंवा एकत्र वेळ घालवून आपण हे नाते अधिक मजबूत करू शकतो. भावंडांचे नाते हे आयुष्यभर टिकणारे आणि प्रत्येक संकटात साथ देणारे असते. या नात्यातील प्रेम, विश्वास आणि जिव्हाळा यांची किंमत शब्दांत व्यक्त करता येत नाही. राष्ट्रीय भावंड दिनाच्या निमित्ताने आपण आपल्या भावंडांसोबतचे नाते अधिक घट्ट करण्याचा संकल्प करूया.



भूमी अभिलेख दिन विशेष

# नोंदी, कागदपत्रे यांचे अचूक व्यवस्थापन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जमीन ही मानवाच्या जीवनातील अत्यंत महत्त्वाची संपत्ती मानली जाते. शेती, उद्योग, निवास आणि विकास यांचे मूळ केंद्र म्हणजे जमीन. त्यामुळे जमिनीशी संबंधित नोंदी, कागदपत्रे आणि हक्क यांचे व्यवस्थापन अत्यंत महत्त्वाचे ठरते. या पार्श्वभूमीवर १० एप्रिल रोजी 'भूमी अभिलेख दिन' साजरा केला जातो. या दिवसाचे उद्दिष्ट म्हणजे नागरिकांमध्ये भूमी अभिलेखांविषयी जागरूकता निर्माण करणे आणि पारदर्शक प्रशासनाला प्रोत्साहन देणे.

### भूमी अभिलेख म्हणजे काय?

भूमी अभिलेख म्हणजे जमिनीच्या मालकी, हक्क, वापर, क्षेत्रफळ, सीमारेषा आणि व्यवहार यासंबंधीची अधिकृत नोंद. हे अभिलेख शासकीय पातळीवर जतन केले जातात आणि जमीन व्यवहारांमध्ये ते कायदेशीर पुरावा म्हणून वापरले जातात.

### भूमी अभिलेखांचे महत्त्व

मालकी हक्काची खात्री : जमिनीचा खरा मालक कोण आहे, हे अभिलेखांमुळे स्पष्ट होते.
विवाद टाळण्यास मदत : अचूक नोंदी असल्यास जमीनविषयक वाद कमी होतात.
कर्ज व आर्थिक व्यवहार : बँका व वित्तीय संस्था कर्ज देताना भूमी अभिलेखांची पडताळणी करतात.
विकासासाठी आधार : शासनाच्या विकास योजनांसाठी भूमी अभिलेख अत्यंत आवश्यक असतात.



### डिजिटायझेशनचा वाढता वापर

अलीकडच्या काळात भूमी अभिलेखांचे डिजिटायझेशन मोठ्या प्रमाणावर होत आहे. महाराष्ट्रात 'महाभूलेख' पोर्टलद्वारे ७/१२ उतारा, ८ अ आणि इतर कागदपत्रे ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात आली आहेत. यामुळे नागरिकांना कार्यालयीन फेरफटका कमी करावा लागतो आणि पारदर्शकता वाढते.

### शेतकरी आणि नागरिकांसाठी फायदे

भूमी अभिलेखांचे संगणकीकरण झाल्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीची माहिती सहज मिळते. पीककर्ज, विमा योजना आणि शासकीय अनुदानासाठी आवश्यक कागदपत्रे मिळवणे सोपे झाले आहे. तसेच, जमीन खरेदी-विक्री प्रक्रियाही अधिक सुलभ आणि सुरक्षित झाली आहे.

### आव्हाने आणि उपाय

जरी डिजिटायझेशनमुळे सुविधा वाढल्या असल्या तरी काही ठिकाणी माहितीतील त्रुटी, अद्ययावत नोंदींचा अभाव आणि तांत्रिक अडचणी यांसारखी आव्हाने आहेत. या समस्या दूर करण्यासाठी नियमित नोंद अद्ययावत करणे, जनजागृती वाढवणे आणि तांत्रिक सुविधा सुधारणा करणे आवश्यक आहे. भूमी अभिलेख दिन हा केवळ एक औपचारिक कार्यक्रम नसून, नागरिकांना त्यांच्या हक्कांविषयी जागरूक करण्याचा एक महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. पारदर्शक, अचूक आणि सुलभ भूमी अभिलेख प्रणाली ही देशाच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यावश्यक आहे.

# भन्नाट कल्पना सुचली अन् सुरू केला व्यवसाय

## आज आहे वार्षिक ३३३ कोटींचा टर्नओव्हर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सक्सेस स्टोरी

व्यावसायिक कल्पना कोणती यशस्वी होईल हे ओळखणे सोपे नसते. कधी-कधी लोक व्यवसाय उभारण्यासाठी कोट्यवधी रुपये गुंतवतात, पण तो टिकत नाही. तर कधी-कधी बेडरूममधून सुरू झालेला व्यवसाय जागतिक ब्रँड बनतो. ब्लू तोकाई कॉफी रोस्टर्सची कहाणी अशीच काहीसी आहे.



२०१३ मध्ये नम्रताने तिच्या आई-वडिलांच्या घरातील एका रिकाम्या, प्रशस्त बेडरूममध्ये 'द ब्लू तोकाई' सुरू केले. फक्त ५०० ग्रॅम कॉफी बीन्स आणि दोन टेबल-खुर्च्या घेऊन तिने तिच्या घरातच कॉफी शॉप उघडले. शेतकऱ्यांकडून थेट उच्च-गुणवत्तेचे अरेबिका बीन्स मिळवून ते देशांतर्गत ग्राहकांसाठी रोस्ट करणे, हे तिचे ध्येय होते. सुरूवातीला अनेक आव्हाने होती, पण व्यवसायाने वेग घेतला.

ज्या काळात भारतात परदेशी ब्रँड्सचे वर्चस्व होते आणि प्रीमियम कॉफी निर्यातीद्वारे येत होती, त्या काळात नम्रता आणि चित्तरंजन यांनी एक प्रीमियम कॉफी चेन सुरू केली. नम्रता आणि चित्तरंजन यांनी 'भारत की कॉफी' या स्थानिक ब्रँडचा प्रचार केला आणि आपल्या बचतीतून एक लहान तैवानी टेबलटॉप रोस्टर विकत घेतले. त्यांनी ते त्यांच्या रिकाम्या बेडरूममध्ये बसवले. ही प्रक्रिया वाढतच गेली. कॉफीच्या चवीने लोकांना त्यांच्या स्थानिक कॉफी शॉपकडे आकर्षित करण्यास सुरूवात केली. आज, 'द ब्लू तोकाई'ची देशभरात १५० हून अधिक रेस्टॉरंट्स आणि कॉफी आउटलेट्स आहेत.

मॅट चित्तरंजन आणि नम्रता अस्थाना यांच्या कहाणीने शिवम शाही यांना त्यांच्यासोबत आणले. या पती-पत्नीच्या त्रिकुटाने 'ब्लू तोकाई कॉफी रोस्टर्स'ला एक जागतिक ब्रँड बनवले आहे. भारताबाहेर त्यांचा ब्रँड जपान आणि दुबईपर्यंत पोहोचला आहे. कंपनीचा महसूल आता एका मल्टी-चॅनल उपक्रमात रूपांतरित झाला आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये कंपनीने वार्षिक ५० टक्के वाढ साधत ३३२.७ कोटी रुपयांचा महसूल गाठला.

'ब्लू तोकाई कॉफी रोस्टर्स' हा प्रीमियम भारतीय अरेबिका बीन्सच्या सोर्सिंग, रोस्टिंग आणि रिटेलिंगमुळे एक लोकप्रिय ब्रँड बनला आहे. कॉफी व्यतिरिक्त, कंपनी आता स्नॅक्स आणि शीतपेये देखील विकते.

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे

